मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी जनहित याचिका क्र. ११३/२०१७ मध्ये दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने किटकनाशक फवारणीमध्ये मृत झालेल्या शेतकरी/ शेतमजूर यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्यासाठी रु. १.७० कोटी आकस्मिकता निधी अग्रीम मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक- सीपीएस १११८/प्र.क्र. १०१/१७-अे,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १८ मे, २०१८

पहा:- १) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी जनहित याचिका क्र.११३/२०१७ मध्ये दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी दिलेला न्यायनिर्णय.
२) आयुक्त (कृषि) यांचे पत्र क्र. गुनियो/गुनि-७/८/ किना/ विषबाधा/ आम/ ९७९ / २०१८, दि. १५ मे, २०१८
३) शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि २०१८/प्र.क्र.३/ अर्थ-१३, दि. १५ मे, २०१८
४) परिपत्रक क्र. वित्त विभाग, सीएनएफ- १०८६/१५३/ अर्थसंकल्प-३, दि. २८/०८/१९८६

प्रस्तावना :-

राज्यात कापूस व सोयाबीन पिकांवर किटकनाशकांची फवारणी करताना विषबाधा होऊन एकूण ६३ शेतकरी/ शेतमजूर यांच्या झालेल्या मृत्यूबाबत शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ११३/२०१७ मध्ये, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी अंतिम न्याय निर्णय देण्यात आलेला आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी मृत शेतकरी/ शेतमजूरांच्या कुटूबियांना प्रत्येकी रु.४ लाख प्रमाणे एकसमान आर्थिक मदत देण्याचे आदेश दिलेले आहेत. यवतमाळ जिल्हयात किटकनाशकांची फवारणी करताना विषबाधा होवून १२ शेतकरी व ९ शेतमजूर मिळून एकूण २१ व्यक्तींचा मृत्यू झालेला होता. सदर घटनेमध्ये यवतमाळ जिल्हयातील २१ शेतकरी/ शेतमजूर यांना मा. मुख्यमंत्री सहायता निधीमधून प्रत्येकी रु. २ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली होती. तसेच, शेतकऱ्यांसाठी असलेल्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून १२ शेतकऱ्यांना रु. २ लाख इतकी विम्याची नुकसान भरपाई रक्कमसुध्दा मिळणार होती. (परंतु प्रत्यक्षात केवळ ८ शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना प्रत्येकी रु. २ लाख इतकी नुकसान भरपाई विमा कंपन्यांकडून देण्यात आलेली आहे) शेतमजूरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ अनुज्ञेय नसल्यामुळे नुकसान भरपाई अनुज्ञय नव्हती. सारांशाने, मृत शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना प्रत्येकी रु. ४ लाख (रु. २ लाख मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून व रु. २ लाख गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून) इतकी आर्थिक मदत अनुज्ञेय होती, तर, शेतमजुरांना प्रत्येकी रु. २ लाख मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत अनुज्ञेय होती. तथापि, मृत पावलेल्या शेतकरी व शेतमजूरांच्या कुटूंबियांना एकसमान रु. ४ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात यावी, असे आदेश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ

नागपूर यांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी दिलेले आहेत. तसेच, यवतमाळ व्यतिरिक्त राज्यातील इतर जिल्हयात विषबाधेमुळे मृत्यू झालेल्या शेतकरी/ शेतमजूरांच्या कुटूंबियांना देखील तितकीच आर्थिक मदत देण्यात यावी, असे ही आदेश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिलेले आहेत.

२. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल जनहीत याचिका क्रं.११३/२०१७ मधील दिनांक २२.०२.२०१८ रोजीच्या न्यायालयीन निर्णयानुसार राज्यात शेतीपीकांवर किटकनाशकांची फवारणी करताना विषबाधा होऊन मृत झालेल्या २९ शेतमजुर व ३४ शेतकरी अशा एकुण ६३ जणांच्या कुटुंबियांना अधिकत्तम प्रत्येकी रुपये ४ लाखाची आर्थिक मदत दयावयाची आहे. सदर मदत ही मुख्यमंत्री सहायता निधी, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना व आकस्मिकता निधी या तिन्ही मार्गाने उपलब्ध होणाऱ्या निधीतून अधिकत्तम रु. ४ लाख इतकी दयावयाची आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत विमा कंपनीकडे कार्यवाहीत असलेल्या २ प्रस्तांवाबाबत विमा कंपनीने नुकसान भरपाई मंजूर केल्यास सदर दोन प्रकरणी केवळ रु.२ लाख प्रत्येकी इतकीच आर्थिक मदत अनुज्ञेय राहील. आणि जर विमा कंपनीने नुकसान भरपाई नामंजूर केल्यास आर्थिक मदत प्रत्येकी रु.४ लाख इतकी अनुज्ञेय राहील.

३. आता, वित्त विभागाने संदर्भाकित दिनांक १५ मे, २०१८ रोजीच्या ज्ञापनान्वये २६ शेतकरी व २९ शेतमजूर मिळुण एकुण ५५ मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याकरीता रु. १.७० कोटी इतका निधी आकस्मिकता निधीतून उपलब्ध करुन देण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुषंगाने, सदर निधी राज्यातील मृत शेतकरी/ शेतमजूरांच्या कुटूंबियांना वितरीत करण्याकरीता शासन पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१७-२०१८ मध्ये राज्यात शेती पिकांवर किटकनाशकांची फवारणी करताना एकूण ६३ शेतकरी/ शेतमजूर यांचा मृत्यू झालेला होता. त्यासंदर्भातील <u>तक्ता</u> सोबत जोडण्यात आलेला आहे. **<u>(परिशिष्ट-अ)</u>** यवतमाळ जिल्हयातील केवळ ८ मृत शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना रु. ४.०० लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित ४ शेतकरी व ९ शेतमजूर आणि राज्यातील इतर जिल्हयातील २२ शेतकरी व २० शेतमजुर यांच्या कुटूंबियांना (एकुण ५५ व्यक्तींच्या कुटूंबियांना) प्रत्येकी रु. ४ लाख इतकी एकसमान आर्थिक मदत करण्याकरीता, आकस्मिकता निधीतून रु. १.७० कोटी इतका निधी (एक कोटी सत्तर लाख फक्त) उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. ज्या मृत शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत द्यावयाची आहे त्यांच्या नावांची यादी **<u>(परिशिष्ट- ब)</u>** आणि ज्या मृत शेतमजूरांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत करावयाची आहे, त्यांच्या नावांची यादी **<u>(परिशिष्ट- क)</u>** सोबत जोडली आहे. सदर परिशिष्टाप्रमाणे मृत शेतकरी/ शेतमजूर यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदतीचे वितरण करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री सहाय्यता निधी, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना व आकस्मिक निधी या तिन्ही मार्गाने उपलब्ध होणाऱ्या निधीतून द्यावयाची मदत ही रु. ४ लाखापेक्षा अधिक होणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

३. सदर रु. १.७० कोटी निधी चालू सन २०१८-१९ च्या पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

"मागणी क्रमांक डी- ३
२४०१ पीक संवर्धन
००
००१ संचालन व प्रशासन
(००) (०१) कृषि आयुक्तालय (२४०१ ०१२७) (अनिवार्य) (भारित)
५०, इतर खर्च"

४. प्रस्तुत प्रकरणी, कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पूणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. संबंधित जिल्यांच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील "लेखा अधिकारी" यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे, त्यांनी निधी आहरित करुन, मृत शेतकरी / शेतमजूरांच्या कुटूंबियांना प्रदान करण्याकरीता संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वर्ग करावा.

५. नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांचे लक्ष महाराष्ट्र आकस्मिकता निधी नियम क्रमांक ६, ८ आणि १२ कडे वेधण्यात येत आहे. तसेच नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांनी शासन परिपत्रक क्रमांक- सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८/०८/१९८६ च्या परिच्छेद २(१) मध्ये दर्शविलेल्या सूचनांचे आणि खालील निर्देशांचे अनुपालन करावे.

१. कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी, आकस्मिकता निधीमधून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण् अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात / पत्रात आगाऊ रकमेतून खर्च करताना सादर करण्यात येणाऱ्या देयकाचा आकस्मिकता निधी अग्रीम शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक: आकनि-२०१८/ प्र.क्र. ३/ अर्थ-१३, दिनांक १५ मे, २०१८ अन्वये मंजूर असे लाल शाईने लिहावे, अशी स्पष्ट सूचना त्या आदेशात/ पत्रात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.
२. कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी आकस्मिकता निधीतून मंजूर केलेली रु.१.७० कोटी अग्रीम रक्कम दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत पूर्णत: खर्च होईल याची दक्षता घ्यावी.
३. आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या खर्चाचा हिशोब वेगळा ठेवून त्यासंबंधीचा मासिक खर्चाचा प्रगती अहवाल या विभागास, तसेच, वित्त विभाग आणि महालेखापाल यांना सादर करण्यात यावा.
४. देयकासमवेत जोडण्यात येणाऱ्या संगणक स्लिपमध्ये मुख्य लेखाशिर्ष /गौण लेखाशिर्ष/ संकणक सांकेतांक इत्यादीचा उल्लेख करावा.
५. संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी) (यवतमाळ , अकोला, बुलढाणा, अमरावती, वर्धा,नागपूर, चंद्रपूर,

भंडारा, गडचिरोली, धुळे, नंदुरबार, जळगाव, नांदेड, अहमदनगर, सोलापूर) यांनी आकस्मिकता निधीच्या खर्चाची देयके काढताना आकस्मिकता निधी सांकेतांक ८०००७४७६ चा वापर करावा.

६. आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेले अग्रीम ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेले आहे, त्याच प्रयोजनासाठी वापरण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

७. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ११३/२०१८/ व्यय-१, दिनांक १०/०५/२०१८ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५१८१५२८११०७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prakash R. Kadam

Digitally signed by Prakash R. Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=944e446a6b36b86a52f12def26aa74e1d37e67433a0ce27e6a2caf774b9795c6, cn=Prakash R. Kadam
Date: 2018.05.18 15:52:08 +05'30'

(प्रकाश रा. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) जिल्हाधिकारी (यवतमाळ , अकोला, बुलढाणा, अमरावती, वर्धा,नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, धुळे, नंदुरबार, जळगाव, नांदेड, अहमदनगर, सोलापूर)
३) कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पूणे
६) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (यवतमाळ , अकोला, बुलढाणा, अमरावती, वर्धा,नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, धुळे, नंदुरबार, जळगाव, नांदेड, अहमदनगर, सोलापूर)
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
९) वित्त विभाग, साधनसंपत्ती/ अर्थोपाय/ व्यय-१ / अर्थसंकल्प-१३
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २, महाराष्ट्र, नागपूर
१२) वरिष्ठ लेखाधिकारी, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, व्हिएलसी (एएसी) शाखा, यांचे कार्यालय, महाराष्ट्र, मुंबई
१३) वरिष्ठ लेखाधिकारी, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, व्हिएलसी (एएसी) शाखा, यांचे कार्यालय, महाराष्ट्र, नागपूर
१४) महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१५) महालेखापाल (लेखापरीक्षा)- २, महाराष्ट्र, नागपूर
१६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२.
१७) निवड नस्ती, १७- अे कार्यासन.

राज्यातील किटकनाशक हाताळणी (फवारणी / धुरळणी) करतांना विषबाधा होवून अपघाती मृत्यु झालेल्यांची शेतमजूरांची यादी

अ.क्र.	जिल्हा	तालुका	पत्ता	विषबाधा झालेल्या व्यक्तीचे नाव	मा. मुख्यमंत्री सहायता निधीतून दिलेली मदत (रू. लाख)	PIL निर्णयानुसार एकसमान रक्कम अदा करण्यासाठी द्यावयाची मदत (रू. लाख)	एकुणात मदत (रू. लाख)
१	यवतमाळ	कळंब	पोळयाचा मारोती	देविदास रामाजी मडावी	२	२	४
२		घाटंजी	कुर्ली-पारवा	रमेश येरन्ना चिल्लरवार	२	२	४
३		मारेगाव	मारेगांव	वसंत केशव चिडाम	२	२	४
४		दिग्रस	डेहणी कलगांव	शेख अयुब शेख महंमद	२	२	४
५		घाटंजी	मानोली	बंडु चंद्रभान सोनुले	२	२	४
६		दारव्हा	सेवादास नगर	रवि दुलसिंग राठोड	२	२	४
७		केळापुर	टेंभी	प्रदिप भाऊराव सोयाम	२	२	४
८		आर्णी	शेंदुरसनी	दिपक शामराव मडावी	२	२	४
९		झरी जामणी	दिग्रस	मधुकर पोचीराम बावणे	२	२	४
१०	नागपूर	कामठी	उनगाव	मुरलीधर रामचंद्र खडसे	०	४	४
११	नागपूर	भिवापूर	सोमनाळा	मनोहर चरण चहांदे	०	४	४
१२	नागपूर	मौदा	आष्टीखात	नितेश देवराव ढोलवार	०	४	४
१३	चंद्रपूर	राजूरा	साखरी	बालाजी बारजू कोवे	०	४	४
१४	चंद्रपूर	पोंभुर्णा	चेकठानेवासना	साईनाथ रघुनाथ सोयाम	०	४	४
१५	वर्धा	हिंगणघाट	हिंगणघाट	विजय रमेश ठाकरे	०	४	४
१६	भंडारा	मोहाडी	कांद्री	प्रभू हरीचंद्र मोरांडे	०	४	४
१७	अमरावती	दर्यापूर	म्हैसपुर	किरण प्रेमनाथ ठाकरे	०	४	४
१८	बुलडाणा	शेगांव	मनसगांव	संतोष श्रीराम वानखेडे	०	४	४
१९	बुलडाणा	खामगांव	घारोड	विठ्ठल प्रकाश पाचपोर	०	४	४
२०	अकोला	बार्शि टाकळी	माळीपुरा	नितीन श्रीकृष्ण खंडारे	०	४	४
२१	अकोला	तेल्हारा	तेल्हारा	रामेश्वर श्रीराम वाघ	०	४	४
२२	अकोला	मुर्तिजापुर	माटोडा	प्रविण अजाबराव रायबोले	०	४	४
२३	अकोला	बाळापुर	बदलापुर	संदिप जगदेव सिरसाठ	०	४	४
२४	अकोला	बाळापुर	पारस	शेख ईमरान शेख लालु	०	४	४
२५	अकोला	अकोला	आगर	राजेश मनोहर फुकट	०	४	४
२६	अकोला	बार्शि टाकळी	इंदिरा नगर	गणपत अनारसिंग चव्हाण	०	४	४
२७	सोलापूर	माढा	अरण	संतोष बाळासाहेब शिंदे	०	४	४
२८	जळगाव	धरणगांव	भवरखेडे	समाधान रमेश भिल	०	४	४
२९	नंदुरबार	तळोदा	नवागाव	काशिनाथ भगवान ठाकरे	०	४	४
	एकुण				१८	९८	११६

कृषि संचालक,
(निविष्ठा व गुण नियंत्रण)

परिशिष्ट - ब ६३

राज्यातील किटकनाशक हाताळणी (फवारणी / धुरळणी) करतांना विषबाधा होवून अपघाती मृत्यु झालेल्यांची शेतकरी यादी

जिल्हा	तालुका	पत्ता	विषबाधा झालेल्या व्यक्तीचे नाव	गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेतून दिलेली मदत (रू. लाख)	मा. मुख्यमंत्री सहायता निधीतून दिलेली मदत (रू. लाख)	PIL निर्णयानुसार एकसमान रक्कम अदा करण्यासाठी द्यावयाची मदत (रू. लाख)	एकुणात मदत (रू. लाख)
[illegible]	भिवापुर	धामणगाव	प्रभाकर बापुराव मिसाळ	2	0	2	4
[illegible]	मौदा	पावडदौना	संभाजी मोतीराम वांगे	2	0	2	4
[illegible]	कळमेश्वर	कळमेश्वर	माणिक सदाशिव शेंडे	2	0	2	4
[illegible]	उमरेड	हिवरा	माणिक रावजी शेलारे	2	0	2	4
[illegible]	कोरपना	चनई बु.	रामशिव जंगू कुमरे	2	0	2	4
[illegible]	राजुरा	बाबापुर	सुरज गोविंदा पारखी	2	0	2	4
[illegible]	लाखांदूर	लाखांदूर	रमेश टिकाराम प्रधान	2	0	2	4
गडचिरोली	वडसा	उसेगाव	गुणवंत देवाजी बोरकर	2	0	2	4
यवतमाळ	कळंब	सावरगाव	गजानन नामदेव फुलमाळी	0	2	2	2
[illegible]	झरी जामणी	निमणी-मुकुटबन	कैलास विठ्ठलराव पेंदोर	0	2	2	2
यवतमाळ	केळापुर	पहापळ	विठ्ठल देवन्ना पेरकेवार	0	2	2	2
[illegible]	आर्णी	पाळोदी	संतोष उत्तम राठोड	0	2	2	2
[illegible]	अमरावती	इतरगांव	प्रदिप उत्तमराव आवारे	2	0	2	4
[illegible]	अमळनेर	तळेगाव	बापु सोनु चौधरी	2	0	2	4
[illegible]	अकोट	मुंडगाव	अशोक रामकृष्ण दहिभाते	0	0	2	4
[illegible]	अक्कलकोट	शिरवळवाडी	सिध्दराम गोरप्पा घोडे	0	0	2	4
[illegible]	पवनी	कार्तुली	राजेश हरीचंद्र शहारे	0	0	4	4
गडचिरोली	सिरोंचा	येला	रमेश राजन्ना शेट्टी	0	0	4	4
गडचिरोली	चामोर्शी	गणपूर	दिनकर गणपती सतबत्तकर	0	0	4	4
अकोला	अकोट	बोर्डी	फिरोजखान साहेब खान	0	0	4	4
अहमदनगर	श्रीरामपुर	मातापुर	प्रदिप बाळासाहेब उंडे	0	0	4	4
[illegible]	सिंदखेडा	बीरदेल	दशरथ रमेश कोळी	0	0	4	4
[illegible]	किनवट	कोल्हारी (परोटी)	माधव संभाजी बडुले	0	0	4	4
[illegible]	माहूर	सिंदखेड	मारुती कीशन दुधकोहळे	0	0	4	4
[illegible]	[illegible]	शिवणी जामगा	अशोक गणपती जोगदंड	0	0	4	4
[illegible]	मुखेड	हरजु तांडा मंग्याळ	सुधाकर खुशाल चव्हाण	0	0	4	4
एकुण				20	8	72	96

(सही)
कृषि संचालक,
(विस्तार व गुण नियंत्रण)
कृषि आयुक्तालय [illegible]

परिशिष्ट- अ

सद्य:स्थितीत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना व मा. मुख्यमंत्री सहायता निधीतून करण्यात आलेल्या मदतीचा तपशील खालीलप्रमाणे. (निधी रु. लाख)

अ.क्र.	जिल्हा	विषबाधेने मृत्यू प्रकरणे संख्या			शेतकऱ्यांना देण्यात आलेला लाभ			मा. मुख्यमंत्री सहायता निधी शेतमजूरांना देण्यात आलेला लाभ
		शेतमजूर	शेतकरी	एकूण	गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना	मा.मुख्यमंत्री सहायता निधी	एकूण	
१	जळगाव	१	१	२	१	०	१	०
२	धुळे		१	१	०	०	०	०
३	नंदुरबार	१	०	१	०	०	०	०
४	अहमदनगर	०	१	१	०	०	०	०
५	सोलापूर	१	१	२	०	०	०	०
६	यवतमाळ	९	१२	२१	८	१२	२०	९
७	अमरावती	१	१	२	१	०	१	०
८	अकोला	७	२	९	०	०	०	०
९	बुलढाणा	२	०	२	०	०	०	०
१०	नागपूर	३	४	७	४	०	४	०
११	चंद्रपूर	२	२	४	२	०	२	०
१२	भंडारा	१	२	३	१	०	१	०
१३	गडचिरोली	०	३	३	१	०	१	०
१४	वर्धा	१	०	१	०	०	०	०
१५	नांदेड	०	४	४	०	०	०	०
	एकूण	**२९**	**३४**	**६३**	**१८**	**१२**	**३०**	**९**